सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ **Website:-** www.barti.in **E-mail:** - dg@barti.in

जा.क्र./बार्टी/CET/प्रवेशपत्र/६०८५ दिनांक: ११/०९/२०२५

**महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष धोरणानुसार सन २०२५-२६ करिता बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत घेण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग – नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम -सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) संदर्भात**

## महत्वाची सूचना

सन २०२५-२६ करिता महाराष्ट्र राज्यातील बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थामधून स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नामवंत खाजगी संस्थेमधून प्रशिक्षण देण्यासंदर्भातील योजनेच्या लाभासाठी प्रशिक्षणार्थी निवड करण्यासाठी बार्टी, पुणे मार्फत सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) घेण्यात येणार आहे. या करिता इच्छुक व पात्र उमेदवारांकडून त्या त्या संस्थानुसार घेण्यात येणाऱ्या योजनेच्या लाभासाठी दिनांक ३०/०८/२०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते.

त्यानुसार सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) दिनांक १४/०९/२०२५ ते २७/०९/२०२५ या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे याबाबत सविस्तर वेळापत्रक तसेच प्रवेशपत्र (Admit card) बाबत माहिती दिनांक १०/०९/२०२५ रोजी बार्टी संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकानुसार दिनांक १४/०९/२०२५ व दिनांक १५/०९/२०२५ रोजी संघ लोकसेवा आयोग – नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम-सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) आयोजित करण्यात आलेली होती.

तथापि दिनांक १४/०९/२०२५ व दिनांक १५/०९/२०२५ रोजी संघ लोकसेवा आयोग – नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम सामयिक प्रवेश परीक्षा (CET) देणाऱ्या उमेदवारांना ६ दिवस अगोदर परीक्षा केंद्राच्या शहराची माहिती उपलब्ध न झाल्याने **दिनांक १४/०९/२०२५ व दिनांक १५/०९/२०२५ रोजी होणाऱ्या संघ लोकसेवा आयोग – नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम -सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) पुढे ढकलण्यात येत आहेत. तसेच प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकानुसार दिनांक १६/०९/२०२५ ते दिनांक २७/०९/२०२५ रोजी आयोजित ऑनलाईन परीक्षा निर्धारित वेळापत्रकानुसार घेण्यात येतील.**

संघ लोकसेवा आयोग – नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम - सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) परीक्षेचे सुधारित वेळापत्रक बार्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-
(सुनील वारे)
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तथा सदस्य, स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम संनियंत्रण व अंमलबजावणी समिती.**